मराठे प्रतिष्ठान, मुंबई

Public Trust Reg. No. E-7918 (BOM) Dt. 12.1.1981
Regd. Office : Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg,
Prabhadevi, Mumbai 400 025. Web.: maratheprat ishthan.org




चैत्र शुद्ध प्रतिपदा, ९ एप्रिल २०२४

**नमस्कार,**

**सर्व कुलबांधव व भगिनींना मराठे प्रतिष्ठान विश्वस्त, कार्यकारी मंडळ, तसेच वैयक्तिक माझ्यातर्फे गुढीपाडवा तसेच हिंदू नववर्षदिनाच्या हार्दिक शुभेच्छा.**

आपल्या सर्व सभासदांबरोबर गुढीपाडवा व दिवाळीनिमित्ताने दरवर्षी संवाद साधतांना खूप आनंद होतो.

सद्यपरिस्थितीत पत्रलेखन हे जवळपास नाहीसे होत चालले आहे. पत्र जर पोस्टाने पाठवले तर मिळेल याची शाश्वती नाही म्हणून आपण सर्व पत्रव्यवहार आता ईमेल, वॉट्सप, फेसबुकमार्फत चालू ठेवतो. त्याला चांगला प्रतिसाद मिळत असून काही अपवादात्मक सभासद नाराज आहेत.
गेल्या गुढीपाडव्यापासून या मार्चअखेरीस जवळपास २० नवीन सभासदांची नोंदणी झाली यात सर्व वयोगटातील आहेत. माझ्या कारकिर्दीत आपण ६ व ७ जानेवारी २४ ला कणकवली येथे कपि गोत्रीय मराठे प्रतिष्ठान आयोजित कुलसंमेलन अतिशय छान पद्धतीने, कोकणातील निसर्गाच्या सानिध्यात यशस्वी करण्यात सर्वच कुलबांधव व भगिनी, देणगीदार, जाहिरातदार यांनी भरपूर प्रतिसाद दिला त्यांना मनापासून धन्यवाद, विशेषतः आपले कार्यवाह श्री.हेमंत यांचे अथक परिश्रम तसेच अध्यक्ष कार्योपाध्यक्ष सर्व विश्वस्त व कार्यकारी मंडळातील सदस्यांकडून बहुमूल्य सहकार्य लाभले.

आपण मार्च २४ चा हितगुज अंक कुलसंमेलन विशेषांक प्रकाशित केला भरपूर रंगीत छायाचित्र असलेला अंक उल्लेखनीय करण्यात आपल्या संपादिका सौ. सुमेधाताई व ज्या सभासदांकडून लेख, रंगीत छायाचित्र उपलब्ध झाले त्यांना धन्यवाद.

आता मराठे प्रतिष्ठानच्या उपक्रमासंबंधित थोडक्यात माहिती देणे आवश्यक आहेच. सद्यपरिस्थितीत प्रतिष्ठानचे कार्य पुढे नेण्यास नवनवीन सभासदांकडून सहकार्य अपेक्षित आहे. सर्वात किचकट काम धर्मदाय आयुक्तालयातील पत्रव्यवहार. दर दिवशी नवीन कायदे, नवीन पद्धत आणि आता तर जास्तीत जास्त पत्रव्यवहार हा संगणकीय करण्यात आला आहे. त्यात बरेचदा नेटवर्कची अडचण असते. काही प्रमाणात सी ए ना पण काही माहिती उपलब्ध होत नाही.

सद्यपरिस्थितीत कार्यकारी मंडळातील बहुतेक सदस्य वयोवृद्ध आहेत. तरी पण प्रतिष्ठानचे काम पुढे चालू ठेवण्यात यशस्वी आहेत. पण येत्या काही वर्षांत यात वयाच्या ५० चे आतील सभासदांकडून सहकार्य अपेक्षित आहेच. त्यांना योग्य ते मार्गदर्शन नक्कीच देणे शक्य आहे.

आपण मराठे प्रतिष्ठान तर्फे वैद्यकीय व शैक्षणिक मदत करत आहोत. परंतु त्याला अल्प प्रमाणात प्रतिसाद मिळतो. कोणीही कोणताही संकोच न करता जरूर अर्ज दाखल करावेत. आपल्या नियमानुसार योग्य ती मदत केली जाईल.

श्रीनिवासजी आपल्या संगणकीय कुलवृत्तांताचे काम करत आहेत. परंतु काही वैद्यकीय कारणांमुळेच त्यांना काही मर्यादा आल्या आहेत. ते पूर्णत्वास नेणे हे एक उद्दिष्ट आहे. त्यांच्याशी संपर्क साधून सहकार्य अपेक्षित आहे.

आपल्या सभासदांत सर्व पक्षीय आहेत. सर्वांना एक आवाहन आहे. ज्या तारखेला आपल्या लोकसभा मतदार संघात मतदान असेल त्या दिवशी आपले बहुमूल्य मत देणे आपले कर्तव्य आहे. ते कोणास द्यावे हे सुज्ञांस सांगण्याची आवश्यकता नाही.

**परत एकदा सर्व कुलबांधव व भगिनी सभासद, व्यावसायिक व देणगीदार यांना गुढीपाडव्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा.**

**आपले**

**विश्वस्त व कार्यकारी मंडळ**